# जिल्हा परिषद ठाणे, आरोग्य विभाग

## कार्यालयाचा पत्ता - जिल्हा परिषद ठाणे, तळ मजला, वागळे ईस्टेट,रोड नं.22, जीएसटी भवन समोर ठाणे (पश्चिम) 400604

दुरध्वनीक्रमांक - 022-25369682

ईमेलआयडी - thanedhozp@gmail.com

****************************************************************************

मा.सा.अ.वि.मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक मवैअ- १०५४/ प्र.क्र.२४१/सेवा ३ दि. २ मार्च २०१५ व महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक मवैअ-१०५४/ प्र.क्र.२४१/ सेवा ३, दि. २१ एप्रिल २०१५ च्या अनुषंगाने आरोग्य विभाग जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर गट-अ (एस-२०) या संवर्गातील वैद्यकिय अधिकारी गट-अ यांची रिक्त पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने ११ महिन्यांकरीता मानधन तत्वावर फक्त तात्पुरत्या स्वरुपात भरण्यासाठी खालीलप्रमाणे जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

## जाहिरात

| अनु. क्र. | पदाचे नांव | एकत्रित दरमहा वेतन | |
|---|---|---|---|
| | | आदीवासी व दुर्गमभागात | बिगरआदीवासी भागात |
| १ | वैद्यकिय अधिकारी गट-अ एम.बी.बी.एस | ८००००/- | ७५०००/- |

१) मुलाखतीच्या दिनांकास रिक्त असलेली पदे समुपदेशनासाठी दर्शविण्यांत येतील.

२) वयः- अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे वय ५५ वर्षापेक्षा जास्त नसावा.

३) संबंधित वैद्यकिय अधिकारी यांनी महाराष्ट्र वैद्यकिय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र, एम.बी.बी.एस गुणपत्रिका, महाराष्ट्र मेडीकल कॉन्सिल ऑफ इंडीयन मेडीसिन प्रमाणपत्र, सर्व वर्षाच्या पदवी/पदवीका गुणपत्रिका व प्रमाणपत्र, आंतरवासिता प्रमाणपत्र, जात/जातवैधता प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला /वयाचा पुरावा, आधार कार्ड , पॅन कार्ड इत्यादी मुळ कागदपत्र व त्यांच्या छायांकित प्रतीचा एक संच स्वयंसाक्षांकित व पासपोर्ट साईज फोटो सह उपस्थित रहावे.

४) सदर जाहिरात ही प्रसिध्दीच्या तारखेपासुन एक वर्षासाठी ग्राहय धरण्यात येईल.

५) जाहिरात प्रसिध्दी तारखेपासुन दर महिन्याच्या येणा-या १ तारखेला व १५ तारखेला मुलाखती ठेवण्यात येतील, सदर तारखेला सुट्टी असल्यास त्याच्या दुस-या दिवशी ही प्रक्रिया राबविण्यात येईल संबंधीत वैद्यकिय अधिकारी यांनी१ तारखेच्या मुलाखतीसाठी दिनांक १६ ते ३० तारखे पर्यंत व १५ तारखेच्या मुलाखतीसाठी २ ते १४ तारखेपर्यंत या कार्यालयात कार्यालयीन वेळेत अर्ज करावे अर्जाचा विहीत नमुना या कार्यालयात उपलब्ध असुन संबधीतांना त्या- त्या वेळी उपलब्ध करुन दिला जाईल. महिन्याच्या १ व १५ तारखेला मुलाखती दुपारी २ ते ५ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी, ठाणे किंवा जिल्हा परिषद ठाणे यांचे कार्यालयात घेण्यात येतील.

६) उमेदवार भारतीय नागरीक असावा.

७) उपरोक्त आरोग्य संस्थांमध्ये रिक्त असलेल्या वैद्यकिय अधिका-यांच्या जागेवर कंत्राटी वैद्यकिय अधिका-यांची नेमणूक ११ महिन्यांकरिता किंवा नियमित वैद्यकिय अधिकारी अथवा बंधपत्रित वैद्यकिय अधिकारी नियुक्त होईपर्यन्त, यापेकी जे आधी घडेल त्या कालावधीपर्यन्त करण्यांत येईल.

८) सदर पदांकरीता जास्त प्रमाणात उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्यास १:५ प्रमाणे मेरीट नुसार उमेदवारांना मुलाखतीस बोलविण्यात येईल किंवा उमेदवारांची लेखी परिक्षा घेण्यात येईल.

९) वर दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्ती मध्ये बदल तसेच पदांच्या संख्येत बदल, मुलाखतीच्या तारखेत बदल अथवा मुलाखत रदद करण्याचे सर्व अधिकार समिती अध्यक्ष मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांनी राखून ठेवलेले आहेत.

१०) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

| | | |
|---|---|---|
| **स्वाक्षरी/-**<br>**सदस्य सचिव,**<br>**तथा**<br>**जिल्हा आरोग्य अधिकारी**<br>**जिल्हा परिषद ठाणे** | **स्वाक्षरी/-**<br>**सदस्य**<br>**तथा**<br>**मुख्य कार्यकारी अधिकारी,**<br>**जिल्हा परिषद ठाणे** | **स्वाक्षरी/-**<br>**अध्यक्ष**<br>**तथा**<br>**जिल्हाधिकारी ठाणे** |

Scanned with OKEN Scanner